जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# प्रेसनोट क्रमांक - २८३ दिनांक - १०/०७/२०२४

खंडणी विरोधी पथक - २, गुन्हे शाखा,पुणे शहर

## देशी बनावटीचे ०४ कट्टे व ०७ जिवंत काडतुसे बाळगणा-यांना केले जेरंबद

पोलीस निरीक्षक, प्रताप मानकर, खंडणी विरोधी पथक २, गुन्हे शाखा, पुणे शहर यांचे देखरेखी खाली स्टाफ माहिती काढीत असताना पोलीस अंमलदार सुरेंद्र जगदाळे व पवन भोसले यांना मिळालेल्या गोपनीय माहितीचे आधारे अग्निशस्त्र बाळगणा-या **१) संकेत शिवाजी गांडले वय २१ वर्षे, रा.नांदेड फाटा, पुणे २) मंगेश राजु भोसले वय २१ वर्षे, रा. कोल्हेवाडी सिंहगड रोड फाटा, पुणे** यांना मधुकोष सोसायटी समोरुन प्रायेजा सिटी कडे जाणा-या कॅनॉल रोडला वडगाव खुर्द पुणे परिसरामध्ये सापळा रचून त्यांना पकडून त्याचे ताब्यातून देशी बनावटीचे एकूण ०४ पिस्टल व ०७ जिवंत काडतूसे असा किं.रु.१,०३,५४०/- चा माल जप्त करून त्याचे विरुध्द सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं. ३९७/२०२४ भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३ (२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)१३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.अमोल झेंडे,मा. सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे २ श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शानाखाली खंडणी विरोधी पथक २, गुन्हे शाखा, पोलीस निरीक्षक श्री प्रताप मानकर, पोलीस उप निरीक्षक श्रीकांत चव्हाण, मोहनदास जाधव, पोलीस अंमलदार सुरेंद्र जगदाळे, दिलीप गोरे,आजिनाथ येडे,पवन भोसले,संग्राम शिनगारे, विजय गुरव, सैदोबा भोजराव,गणेश खरात, चेतन आपटे,राहुल उत्तरकर,चेतन शिरोळकर, चेतन चव्हाण यांनी केलेली आहे.